मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २६२ * सातारा * सातारा * बुधवार * दि. ५ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# मुंबईचा बालेकिल्ला ठाकरेंनी, तर ठाण्याचा शिंदेंनी राखला !

**संतोष गायकवाड**

**मुंबई :** मुंबईत महाविकास आघाडीला मोठं यश मिळालं आहे. सहा पैकी ४ जागा मविआने जिंकल्या आहेत. ठाकरे गटाने ३ जागेवर तर काँग्रेस, शिंदे गट आणि भाजपने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला आहे. शिवसेनेच्या फोडाफोडीनंतरही मुंबईत ठाकरे गटाला मोठं यश मिळालं आहे. त्यामुळे मुंबईचा बालेकिल्ला राखण्यात ठाकरेंना यश आलं आहे.

दोन वर्षापूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंड करून शिवसेना फोडली. शिवसेनेच्या फोडाफोडीनंतर निवडणूक आयोगाने शिंदे गटाला धनुष्यबाण चिन्ह दिले तर ठाकरे गटाला मशाल चिन्ह मिळाले. पक्षफुटीनंतर उध्दव ठाकरे पहिल्यांदाच निवडणुकीला सामोरे गेले. मात्र मुंबईत त्यांना घवघवीत यश मिळालं आहे. लोकसभेच्या या विजयामुळे मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचे चित्रही स्पष्ट झालं आहे.

**दक्षित मुंबईत अरविंद सावंत यांची हॅट्रीक**

दक्षिण मुंबईतून ठाकरे गटाचे उमेदवार अरविंद सावंत यांनी विजयाची हॅट्रीक केली आहे त्यांनी शिंदे गटाच्या उमेदवार यामिनी जाधव यांचा ५४ हजार मतांनी पराभव केला आहे. या विजयानंतर अरविंद सावंत म्हणाले



की आम्हाला आनंदयाचा आहे की प्रत्येक वेळी मोदींचा चेहरा घेऊन जिंकलो असे भाजपवाले म्हणायचे मात्र आज मला आनंद आहे की मोदींच्या चेह-याशिवाय आम्ही जिंकलो उध्दवजींचा चेहरा घेऊन जिंकलो.

**दक्षिण मध्य मुंबईत अनिल देसाई यांचा विजय**

दक्षिण मध्य मुंबईत ठाकरे गटाचे उमेदवार अनिल देसाई यांचा मोठा विजय झाला आहे त्यांनी शिंदे गटाचे राहूल शेवाळे यांचा पराभव केला आहे. शेवाळे येथून सलग दोनदा निवडून आले होते मात्र यंदा त्यांना देसाई यांनी ५३ हजार ३८४ मतांनी शेवाळे यांचा पराभव केला आहे.

**ईशान्य मुंबईतून संजय दिना पाटील विजयी**

भाजपचा बालेकिल्ला अशी ओळख असणा-या ईशान्य मुंबई लोकसभा मतदार संघात ठाकरे गटाचे संजय दिना पाटील यांनी भाजपचे मिहीर कोटेचा यांचा पराभव केला. त्यामुळे भाजपला मोठा धक्का बसला आहे. संजय दिना पाटील यांना ३ लाख ८९ हजार ६५ मते मिळाली आहेत तर मिहीर कोटेचा यांना ३ लाख ६१ हजार ८२० मते मिळाली आहेत.

## ठाण्यात नरेश म्हस्के तर कल्याणात डॉ श्रीकांत शिंदे विजयी !

**ठाणे लोकसभा मतदार संघातून नरेश म्हस्के आणि कल्याणमधून डॉ श्रीकांत शिंदे यांनी विजय मिळविल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपला बालेकिल्ला राखण्यात यश मिळवलं आहे. शिवसेना फुटीनंतर इथल्या लढतीकडे राज्याचं लक्ष वेधलं होतं. या लढतीत शिंदे यांनी बाजी मारली आहे.**

**ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला समजला जातो. मात्र लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटप होताना महायुतीमध्ये ठाण्यावरुन तिढा निर्माण झाला होता. एकनाथ शिंदे या मतदारसंघासाठी आग्रही असताना दुसरीकडे भाजपाही या मतदारसंघावर दावा केला होता. मात्र जागावाटपात ठाणे कल्याण हे दोन्ही मतदार संघ शिंदेंच्या वाटयाला आले. ठाण्यातून शिंदे यांचे समर्थक माजी महापौर नरेश म्हस्के यांना उमेदवारी देण्यात आली. तर ठाकरे गटाने राजन विचारे यांना उमेदवारी दिली होती. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार राजन विचारे यांचा विजय यांचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र नरेश म्हस्के यांनी ठाकरे गटाचे उमेदवार राजन विचारे यांचा पराभव केला आहे.**

**काँग्रेसच्या वर्षा गायकवाड विजयी**

मुंब्इ उत्तर लोकसभा मतदार संघातून काँग्रेसच्या वर्षा गायकवाड विजयी झाल्या आहेत वर्षा गायकवाड यांनी भाजपचे उमेदवार वकिल उज्वल निकम यांचा पराभव केला आहे गायकवाड आणि निकम यांच्या अटीतटीची लढत झाली मतमोजणीच्या वेळीही कधी गायकवाड तर कधी निकम आघाडीवर होते त्यामुळे या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले होते अखेर वर्षा गायकवाड यांनी ५६ हजार मतांनी विजय मिळविला आहे. निकम यांचा पराभव भाजपला धक्कादायक ठरला आहे.

**भाजपचे पियूष गोयल विजयी**

उत्तर मुंबईतून केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांचा विजय झाला आहे. पियूष गोयल यांनी २५४९५७ मतांची आघाडी घेत काँग्रेसचे उमेदवार भूषण पाटील यांचा पराभव केला आहे. मुंबईतून भाजपला एकमेव जागेवर विजय मिळवता आला आहे. मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रोड शो केला होता तसेच जाहीर सभा घेतल्या होत्या मात्र मोदींचा करिष्मा दिसून आलेला नाही.

उत्तर पश्चिम मुंबईत ट्विस्ट कायम

उत्तर पश्चिम मंबईत शिंदे गटाचे रविंद्र वायकर विरूध्द ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर अशी काँटे कि टक्कर झाली होती. मतमोजणीच्यावेळी इथल्या विजयाची उत्कंठा पावलोपावली वाढत होती. प्रथम अमोल किर्तीकर यांना विजयी घोषीत करण्यात आले होते. मात्र वायकर यांनी फेरमतमोजणीची मागणी केली. त्यानंतर फेरमतमोजणीत ४८ मतांनी वायकर यांचा विजय दाखवला. त्या विजयावर किर्तीकर यांनी आक्षेप घेत पून्हा फेरमतमोजणीची मागणी केली.

उत्तर पश्चिम मुंबईत ट्विस्ट निर्माण झाल्याने या मतदार संघाचा फायनल निकाल घोषित करण्यात आलेला नाही.

तसेच कल्याण लोकसभा मतदार संघातून मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपूत्र डॉ श्रीकांत शिंदे यांनी हॅट्रीक साधली आहे. शिंदे यांनी ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांच्या पराभव केला. त्यामुळे ठाणे आणि कल्याण या दोन्ही मतदार संघात मुख्यमंत्री शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती अखेर हे दोन्ही गड राखण्यात शिंदेंना यश आलं आहे.

# भाजपानं अयोध्या तर मोदींनी विश्वासार्हता गमावलीय : ममता बॅनर्जी

**पश्चिम बंगाल :** तृणमूल काँग्रेसच्या नेत्या व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहेत

देशाच्या राजकारणासाठी आजचा दिवस हा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकसभा निवडणूकीचा निकाल समोर येत आहे. लोकसभा निवडणूकीत एनडीए आणि इंडियामध्ये चुरशीची लढत दिसून येत आहे. यंदा काँग्रेसनी अनेक जागांवर बाजी मारल्याने भाजपला बहुमताचा आकडा मिळाला नाही. निवडणुकीच्या निकालावर देशभरातून अनेक मोठ्या नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहेत. त्या म्हणाल्या, आम्हाला आनंद आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बहुमताचा आकडा मिळाला नाही. पंतप्रधान मोदींनी विश्वासार्हता गमावली आहे. त्यामुळे त्यांनी लगेच राजीनामा द्यायला पाहिजे कारण यावेळी ४०० जागांचा आकडा पार करणार असल्याचे सांगितले होते.एवढा पैसा खर्च करूनही मोदीजी आणि अमित शहा यांचा हा अहंकारामुळे इंडिया गट जिंकला आणि मोदी हरले. ते अयोध्यातही हरले.



भाजपाने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला आहे. याआधी भाजपाने २०१४ आणि २०१९ या निवडणुकीत भाजपाने बहुमत मिळवलं होतं. यावेळी भाजपाने स्वत: ३७० जागा जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. आता आपण जाणून घेऊ भाजपाने २०१४ मध्ये किती जागा लढवल्या आणि २०१९ मध्ये किती जागा लढवल्या? २०१४ मध्ये भाजपाने ४२८ जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी २८२ जागा भाजपाने जिंकल्या होत्या. तर २०१९ ला भाजपाने ४३६ जागांवर निवडणूक लढवली आणि ३०३ जागा मिळवल्या होत्या. भाजपाने २०१४ आणि २०१९ या दोन्ही वर्षांमध्ये बहुमताच्या संख्येपक्षा जास्त जागा मिळवल्या.

दुसरीकडे एनडीएनं मात्र देशभरात सर्व राज्यांमध्ये एनडीए म्हणूनच निवडणूक लढवली. यात एकट्या भाजपानं देशभरात ४४१ जागा लढवल्या असून आणखी ९९ जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील इतर मित्रपक्षांनी लढवल्या. दुसरीकडे इंडिया आघाडीमध्ये काँग्रेसनं ३१८ जागा लढवल्या. त्यापाठोपाठ समाजवादी पक्षानं सर्वाधिक ७५ ठिकाणी उमेदवार उभे केले होते.

महाराष्ट्रात २०२४ च्या निवडणुकीत भाजपाने मागच्यावेळेपेक्षा अधिक जागा स्वत:कडे घेतल्या आहेत. यावेळी शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) असे दोन घटक पक्ष असतानाही २८ जागा मिळविण्यात यश मिळविले आहे. यावेळी भाजपाने अमरावती, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पालघर आणि सातारा हे शिवसेनेचे चार मतदारसंघ स्वत:कडे वळविण्यात यश मिळविले आहे. तर भाजपाच्या कोट्यातला बारामती मतदारसंघ अजित पवार गटाकडे गेला आहे.

२०२४ च्या निवडणुकीला सामोरे जात असताना महायुतीमध्ये जागावाटपाच्या मुद्द्यांवर संघर्ष पाहायला मिळाला.

मुंबईतील तीनही मतदारसंघातील उमेदवार भाजपाने बदलले ईशान्य मुंबईतून मनोज कोटक, उत्तर मध्य मुंबईतून पूनम महाजन आणि उत्तर मुंबईतून गोपाळ शेट्टी यांचा पत्ता कट केला. तर बीडमधून प्रीतम मुंडे, सोलापूरमधून डॉ. जयसिद्धेश्वर स्वामी, जळगावमधून उन्मेष पाटील यांचाही पत्ता कट करण्यात आला. पुण्याचे खासदार गिरीश बापट यांचे निधन झाल्यामुळे त्याठिकाणी मुरलीधर मोहोळ यांना




# सोलापूर काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे

**सोलापूर :** सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांना एकूण ६२०२२५ इतकी मते मिळाली तर भाजपचे राम सातपुतेंना ५४६०२८ मते मिळाली.

यात प्रणिती शिंदें यांचा ७४१९७ इतक्या मताधिक्यांने विजय झाला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर लोकसभेच्या नूतन पहिल्या महिला खासदार प्रणिती शिंदे यांना विजयाचे प्रमाणपत्र दिले. आमदार शिंदे यांचे वडील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये पराभव झाला होता. तसेच त्यांच्या मातोश्री उज्वला शिंदे यांनाही एकदा पराभवाला सामोरे जावे लागले होते. प्रणिती शिंदे यांनी सलग तीन वेळा आमदाराच्या विजयाची हॅट्रिक केली आणि आता चौथ्या वेळेस त्या खासदार झाल्या आहेत. आई-वडिलांच्या पराभवाचा वचपा त्यांनी काढला आहे. हा आनंद त्यांनी कुटुंबीयांसमवेत भर पावसात साजरा केला.



# अखेर बीडमध्ये 'तुतारी' वाजली

## बजरंग सोनवणे यांचा निसटता विजय, मुंडे बहीण-भावास धक्का

**बीड :** बीड लोकसभा मतदारसंघात भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे. एकीकडे देशभरातील निकाल हाती आले, तर दुसरीकडे बीडच्या निकालाने शेवटपर्यंत सस्पेन्स कायम ठेवला. कधी पंकजा मुंडे आघाडीवर जात होत्या, तर कधी राष्ट्रवादीचे बजरंग सोनवणे (इरक्षरीरपस डेपुरुपश) पुढे जात होते. अखेर शेवटच्या ३२ व्या फेरीत बजरंग सोनवणे यांनी बाजी मारली.

२४ व्या फेरी अखेर भाजपाच्या पंकजा मुंडे यांना ३० हजार ४६१ मतांची आघाडी होती. मात्र, २५ व्या फेरीपासून ही लिड घटू लागली. २५ व्या अखेर २२ हजार ५००, २६ वी फेरी १० हजार २७६ , २७ वी फेरी ७ हजार ४२८ अशी आघाडी कमी होत गेली. तर २८ व्या फेरीत बजरंग सोनवणे यांनी ९३२ मतांची आघाडी घेतली. त्यानंतर २९ व्या फेरीत १ हजार २१७, ३० वी फेरी २ हजार ६०२ मतांची आघाडी घेतली. मात्र, ३१ व्या फेरीत पुन्हा पारडे फिरले अन् पंकजा मुंडे ४०० मतांनी पुढे आल्या. परंतु, फेरमतमोजणीची मागणी केल्यानंतर झालेल्या मतमोजणीत शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे ७००० मतांनी विजयी झाले आहेत.

# बारामतीचा गड शरद पवार यांनीच राखला

## सुप्रिया सुळे विजयी

**बारामती :** पुणे जिल्ह्यातील नवीन तर देशाचे लक्ष लागून असलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात दुरंगी लढत झाली. पवार कुटुंबातील ही लढत चुरशीची झाली नाही. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे एक लाखावरुन अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. अजित पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार पराभूत झाल्या आहेत. महायुतीमध्ये अजित पवार यांचा पक्ष केवळ एका जागेवरच विजय मिळणार आहे.

सकाळी सुनेत्रा पवार यांनी घेतली होती आघाडी

सकाळी ९ वाजता सुनेत्रा पवार दहा हजार मतांनी आघाडीवर गेल्या आहेत. बारामतीमध्ये पोस्टल मतमोजणीस सुरुवात झाली आहे. त्यात सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे. त्या सकाळी १०.३० पर्यंत १९ हजार मतांनी पुढे होत्या. विशेष म्हणजे अजित पवार यांच्या बारामती विधानसभा मतदार संघात सुप्रिया सुळे यांनी आघाडी घेतली आहे.

**बारामतीच्या लढतीकडे देशाचे लक्ष**

पवार कुटुंबामध्ये झालेल्या या लढतीकडे देशाचे लक्ष लागले होते. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे तर महायुतीकडून सुनेत्रा पवार निवडणूक रिंगणात होत्या. नणंद-भावजय यांच्या या लढतीत प्रचार दरम्यान अनेक आरोप-प्रत्यारोप झाले होते. बारामती लोकसभा मतदार संघासाठी ७ मे रोजी मतदान झाले होते. बारामतीमध्ये सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे.



बारामती लोकसभा मतदार संघाचा इतिहास बारामती लोकसभा मतदारसंघाकडे यंदा देशाचे लक्ष होते. आतापर्यंत पवार कुटुंबियांचे वर्चस्व या मतदार संघावर राहिले. १९८४ साली शरद पवार यांनी भारतीय काँग्रेस (समाजवादी) पक्षाकडून पहिल्यांदा येथून निवडणूक जिंकली. यापूर्वी या जागेवर काँग्रेसचे वर्चस्व होते. शरद पवार बारामती लोकसभा मतदारसंघातून ६ वेळा, त्यांची कन्या सुप्रिया सुळे ३ वेळा आणि त्यांचे पुतणे अजित पवार एकदा खासदार झाले आहेत.

बारामती लोकसभा मतदारसंघात पुणे जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. त्यात दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि खडकवासला यांचा समावेश आहे. २०१९ च्या निवडणुकीत या जागेवर २१,१४,७१६ मतदार होते. १९५७ मध्ये येथे पहिली निवडणूक झाली. या निवडणुकीत काँग्रेसचे केशवराव जेधे विजयी झाले होते. १९६० च्या पोटनिवडणुकीत आणि १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसचे गुलाबराव जेधे खासदार म्हणून निवडून आले. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसचे आर. के.खाडीलकर तर १९७७ मध्ये जनता पक्षाचे संभाजीराव काकडे विजयी झाले. १९८० मध्ये काँग्रेसने पुन्हा ही जागा काबीज केली आणि शंकरराव बाजीराव पाटील खासदार झाले.

## संपादकीय

# पायावर कुऱ्हाड

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी गेल्या २८ तारखेला केलेल्या भाषणात अटलबिहारी वाजपेयी यांच्या सोबत झालेल्या लाहोर कराराचा भंग करून पाकिस्तानने मोठी चूक केली, असा कबुली जबाब दिला होता. कारगिलचे युद्ध त्यातूनच झाले. शरीफ यांच्या कबुली जबाबाला आठ दिवस झाले नाही, तोच पाकिस्तानने आणखी एक कबुली जबाब दिला. पाकव्याप्त काश्मीर हा विदेशी भाग असल्याचे तिथल्या सरकारी वकिलांनी इस्लामाबाद उच्च न्यायालयात सांगितले. त्यावरून अनेकांना हर्षवायू झाला असेल. पाकिस्तानने प्रथमच अशी कबुली दिल्याचा डांगोरा पिटला जात आहे. भारतात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेण्याची भाषा अनेकांनी वापरली. पाकिस्तानच्या वकिलाच्या दाव्यानंतर पाकव्याप्त काश्मीरमध्ये लगेच भारताने येऊन ताबा घ्यावा, असे म्हटले आहे; परंतु केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी यापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत भारत कुणावरही आक्रमण करणार नाही. भारतात कुणाला सामील व्हायचे असेल, तर त्यांनी तसा निर्णय घ्यावा, असे म्हटले होते. ते असे का म्हटले यामागे पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेणे एवढे सोपे नाही, याची त्यांना जाण आहे. शिवाय पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भाग नाही, हे न्यायालयात जरी पाकिस्तानने सांगितले असले, तरी हा भाग नेमका कुणाचा हे सांगितलेले नाही. शिवाय गेल्या वर्षीच तुरुंगातील पाकव्याप्त काश्मीरच्या कैद्याबाबत पाकिस्तानने ते पाकिस्तानचे नसल्याचा दावा केला होता. जेव्हा काही अडचणीचे प्रसंग येतात, तेव्हा पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरची जबाबदारी टाळतो, हे काही नवीन नाही. लोकसभा निवडणुकीनंतर पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन होईल, त्यासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, असे साकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घातले होते. हा प्रचाराचा भाग होता. त्यांनी जाहीर केल्यानुसार खरेच सहा महिन्यांत पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन होईल का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. त्याचे कारण आपल्याला पाकव्याप्त काश्मीरमधील संघर्ष, तिथली परिस्थिती समजून घ्यावी लागेल. अर्थात असे असले, तरी पाकिस्तानच्या न्यायालयात सरकारी वकिलांनी घेतलेल्या भूमिकेवर सरकारने शिक्कामोर्तब केले असे म्हणता येणार नाही. शिवाय पाकिस्तानी नेत्यांच्या यापूर्वीच्या उक्ती आणि कृतीत वारंवार फरक दिसल्याने आपल्याला 'जित मया' करून चालणार नाही. असे असले, तरी पाकिस्तानने या घटनेतून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून पाकव्याप्त काश्मीर हा बळकावलेला भाग आमचाच आहे, या भारताच्या दाव्याला बळकटी दिली आहे. पाकव्याप्त काश्मीर हा स्वतंत्र देश असल्याचे पाकिस्तानने म्हटलेले नाही. उलट त्यांनी पाकव्याप्त काश्मीर हा विदेशी प्रदेश असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ असाही होतो, की काश्मीर हा स्वतंत्र नसून इतर देशाचा भाग आहे. अप्रत्यक्षपणे का होईना, पाकिस्तानला असे वाटते, की जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि त्याने बळजबरीने त्याचा एक भाग बळकावला आहे. उच्च न्यायालयात सरकारच्या या वक्तव्यावर पाकिस्तानी पत्रकार हमीद मीर संतापले आहेत. पाकिस्तानने इस्लामाबादमधून एका कवीचे अपहरण केले. अपहरण स्वीकारण्याचे नैतिक धैर्य त्यांच्यात नाही आणि आता त्यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये त्यांची अटक दाखवली आहे आणि इस्लामाबाद उच्च न्यायालयात पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश घोषित केला आहे. याचा अर्थ त्यांना पाकव्याप्त काश्मीरमध्ये कब्जा करणाऱ्या सैन्याचा अधिकार मान्य आहे; परंतु पाकिस्तानी न्यायालयांना अधिकार नाही. पाकव्याप्त काश्मीर ही परदेशी भूमी आहे, तर रेंजर्स तिथे का जातात ते सांगा आणि जेव्हा पाकव्याप्त काश्मीरचे पंतप्रधान म्हणतात, की मी रेंजर्सना बोलावले नाही, तेव्हा ते कोणाच्या परवानगीने गेले. त्याला परकीय भूभाग म्हणत पाकिस्तानने काश्मीर प्रश्नाला नवी दिशा दिली आहे. फेडरल प्रॉसिक्युटर जनरल यांनी इस्लामाबाद उच्च न्यायालयात सांगितले, की अहमद फरहाद पाकव्याप्त काश्मीर काश्मीरमध्ये कोठडीत आहे. पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश असल्याने त्यांना इस्लामाबाद न्यायालयात हजर करता येणार नाही. वकिलाच्या या युक्तिवादाने न्यायालयही चकित झाले. न्यायमूर्तींनी विचारले, की जर पाकव्याप्त काश्मीर हा परदेशी प्रदेश आहे तर पाकिस्तानी लष्कर आणि पाकिस्तानी रेंजर्स पाकिस्तानातून तिथे कसे गेले? या वक्तव्यानंतर पाकिस्तानी 'सोशल मीडिया'वर खळबळ उडाली आहे. पाकव्याप्त काश्मीरबाबतच्या या महत्त्वपूर्ण विधानाने पाकिस्तानच्या अधिकृत भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करून भारताची स्थिती मजबूत केली आहे. हे प्रकरण इस्लामाबादमधून अपहरण झालेल्या कवी अहमद फरहाद यांचे आहे. फरहाद यांच्या अटकेनंतर त्यांना पाकव्याप्त काश्मीरमध्ये नेण्यात आले.

पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीर हा त्याचाच भाग असल्याचा दावा फार पूर्वीपासून केला आहे आणि त्याची व्याख्या आझाद काश्मीर अशी केली आहे; पण सरकारी वकिलाच्या या वक्तव्याने हे स्पष्ट झाले आहे, की पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानचा भूभाग नसून पाकिस्तानच्या ताब्यात आहे, म्हणजेच परकीय भूमी त्याच्या ताब्यात आहे. खुद्द पाकिस्तानी अधिकारीही पाकव्याप्त काश्मीरला परकीय भूभाग मानतात, हे या विधानावरून स्पष्ट होते. या विधानाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरही व्यापक परिणाम होऊ शकतो. भारताने फार पूर्वीपासून पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेला प्रदेश मानला आहे आणि तो आपला अविभाज्य भाग असल्याचा दावा केला आहे. पाकिस्तानच्या सरकारी वकिलाच्या या वक्तव्यामुळे भारताच्या दाव्याला बळ मिळाले आहे. विश्लेषक आणि राजकीय पक्षांनी याला पाकिस्तानचे राजनैतिक अपयश म्हटले आहे. हे वक्तव्य पाकिस्तानच्या अधिकृत धोरणाच्या विरोधात तर आहेच; पण त्यामुळे आंतरराष्ट्रीय मंचांवर पाकिस्तानची स्थिती कमकुवत होऊ शकते. पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरचे दोन भागात विभाजन केले आहे. मीरपूर मुझफराबाद हा एक भाग आणि दुसरा गिलगिट बाल्टीस्तान. यातील मीरपूर मुझफराबादला पाकव्याप्त काश्मीर म्हणतात. पाकव्याप्त काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १३ हजार चौरस किलोमीटर आहे. तिथे सुमारे ४० लाख लोक राहतात. पाक संसदेने १९४७ मध्ये पाकव्याप्त काश्मीरसाठी स्वतंत्र राज्यघटना, स्वतंत्र कार्यकारी मंडळ असेल असा निर्णय घेतला. तिथे राष्ट्रपती, पंतप्रधान, त्यांचे मंत्रिमंडळ आहे आणि विधानसभाही आहे. या माध्यमातून हा प्रदेश आझाद काश्मीर असून आमचा त्याच्याशी काही संबंध नाही, असे भासवण्याचा प्रयत्न पाकिस्तानने वारंवार केला. अर्थात ही धूळफेक आहे.

पाकव्याप्त काश्मीरमध्ये राष्ट्रपती, पंतप्रधान असले तरी तो देखावा आहे. तेथील सर्व कारभार हा इस्लामाबादमधूनच चालतो. पाकव्याप्त काश्मीर हा सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. कारण या क्षेत्राच्या सीमारेषा पाकिस्तानातील पंजाबशी, अफगाणिस्तानशी आणि चीनच्या शिनजियांग प्रांताशी जोडलेल्या आहेत. पाकव्याप्त काश्मीरमधील अराजकतावादी परिस्थितीमुळे हा भाग भारताने ताब्यात घ्यावा, अशी मागणी जोर धरीत असली, तरी भावनिकतेच्या पलीकडे जात वास्तवाचे भान ठेवून विचार केल्यास हा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा असल्याचे लक्षात येते. मुळात पाकव्याप्त काश्मीरमध्ये याबाबत दोन मतप्रवाह आहेत. एका गटाला भारतात सामील व्हायचे आहे; तर एक गट १९७१ मध्ये ज्याप्रमाणे भारताने मुक्ती वाहिनीच्या माध्यमातून स्वतंत्र बांगला देशाची निर्मिती केली तशाच प्रकारे पाकव्याप्त काश्मीर स्वतंत्र करावा अशा विचारसरणीचा आहे. तथापि, तशा प्रकारची मदत भारताने केल्यास जम्मू-काश्मीरमध्येही स्वातंत्र्याचे नारे दिले जाऊ शकतात ही धास्ती आहे. दुसरीकडे भारताला हा प्रदेश ताब्यात घ्यायचा झाल्यास थेट युद्ध करावे लागेल. ही बाब भारताच्या धोरणात बसणारी नाही. गेल्या ७५ वर्षांमध्ये भारताने कधीही अशा प्रकारे शेजारी राष्ट्रावर आक्रमण केलेले नाही. सामरिकदृष्ट्या भारत पाकिस्तानपेक्षा कितीही बलशाली असला, तरी हे दोन्हीही देश अण्वस्त्रधारी आहेत. पाकिस्तान हा बेजबाबदार अण्वस्त्रधारी देश आहे; शिवाय पाकव्याप्त काश्मीरमध्ये चीनचेही हितसंबंध गुंतलेले आहेत.त्यामुळे सर्जिकल स्ट्राईक, जागतिक पातळीवरील छोटे-मोठे सशस्त्र संघर्ष, युद्धजन्य स्थिती, जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा असलेले कलम ३७० रद्द करणे या बाबी आणि पाकव्याप्त काश्मीरसारखा भूभाग पुन्हा भारतात सामील होणे या बाबी पूर्णपणे वेगळ्या आहेत, म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीकडे भारत तटस्थपणे पाहात आहे. तिकडे आर्थिक दिवाळखोर झालेला पाकिस्तानही पाकव्याप्त काश्मीरच्या विकासासाठी भरीव गुंतवणूक करण्यास सक्षम नाही. त्यामुळे २३ अब्ज डॉलरची मदत पुरणारी नाही. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांचा हा संघर्ष असाच सुरू राहण्याची शक्यता आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे, ती म्हणजे येणाऱ्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानचे विभाजन होण्याची शक्यता आहे. ?

# १९ मंत्र्यांना पराभवाचा धक्का ; स्मृती इराणी, रावसाहेब दानवे, कपिल पाटील आणि भारती पवार पराभूत

**नवी दिल्ली :** स्मृती इराणी,रावसाहेब दानवे, भारती पवार, कपिल पाटील, अर्जुन मुंडा, आर. के. सिंह यांच्यासह मोदी सरकारमधील१९ मंत्र्यांना पराभवाचा धक्काबसला आहे. पराभूत मंत्र्यांमध्ये तीन कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश आहे.

स्मृती इराणीयांचा अमेठीमध्ये पराभव झाला. अर्जुन मुंडा यांचा खुंटी मतदारसंघात काँग्रेसच्या कालीचरण मुंडा यांनी १.४९ लाख मतांनी पराभव केला. बिहारच्या आरा मतदारसंघातून आर. के. सिंह यांचा ४५ हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव झाला. तर चंदौली येथून महेंद्रनाथ पांडे यांचा सपाचे बिरेंद्र सिंह यांनी पराभव केला. तसेच उत्तर प्रदेशात राज्यमंत्री अजय मिश्रा टेनी, साध्वी निरंजन ज्योती, कौशल किशोर, भानूप्रतापसिंह वर्मा पराभूत झाले.महाराष्ट्रातून राज्यमंत्रीरावसाहेब दानवे, कपिल पाटील आणि भारती पवार यांना पराभवाचा धक्का बसला. पश्चिम बंगालमधून राज्यमंत्री निसिथ प्रामाणिक आणि सुभाष सरकार यांना पराभवाचा सामना करावा लागला. केरळमध्ये तिरुवनंतपूरम येथून राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांचा काँग्रेसचे शशी थरुर यांनी पराभव केला.केरळमध्ये व्ही. मुरलीधरन, राजस्थानात कैलाश चौधरी, कर्नाटकात भगवंत खुबा, तामिळनाडूत एल. मुरुगन, बिहारमधून संजीव बाल्यान पराभूत झाले.तुरुंगातून लढले, विजयी झाले

यावेळी लोकसभा निवडणुक लढविणाऱ्यांत काही उमेदवार असे होते ज्यांनी तुरुंगातून निवडणूक लढविली. विशेष म्हणजे, ते जिंकले. टेरर फंडिंगच्या आरोपात २०१९पासून तुरूंगात असलेले अब्दुल रशीद शेख उर्फ इंजीनिहर रशीद हे बारामुल्ला येथून लढले. त्यांनी दोन लाखांपेक्षा जास्त मताधिक्याने माजी मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांचापराभव केला. तर आसाममधील तुरुंगात कैद असलेला 'वारिस दे पंबाज'चा प्रमुख अमृतपालसिंग याने पंजाबच्या खडुरसाहेब येथून निवडणूक लढविली. त्यानेही पावणेदोन लाखांपेक्षा जास्त मताधिक्याने विजय मिळविला.

# पक्षांतर करून महायुतीतर्फे लढलेले एकसोडून बाकी सगळेच पडले




**मुंबई :** पक्षांतर करून लोकसभा निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांच्या नशिबी संमिश्र यश आले. पक्षांतरानंतर महायुतीतर्फे लढलेले सर्व उमेदवार हरले. आ.रवींद्र वायकर यांनी ऐनवेळी उद्धवसेनेतून शिंदेसेनेत उडी घेतली आणि मुंबई उत्तर-पश्चिममधून त्यांचा अटीतटीच्या लढतीत विजय झाला. 'गजांआड जाणे किंवा पक्ष बदलणे हे दोनच पर्याय उरले होते, जड अंत:करणानेच मी पक्ष बदलला' असे विधान ऐन प्रचारकाळात वायकर यांनी केले होते.

माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील शिंदेसेनेत गेले पण लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी अजित पवार गटात प्रवेश करून शिरूरची उमेदवारी मिळविली मात्र ते पराभूत झाले. उमरेडचे काँग्रेस आमदार राजू पारवे यांची स्थिती ना इकडचे ना तिकडचे अशी झाली. आमदारकी सोडून ते शिंदेसेनेत गेले, रामटेकमधून लढले आणि पराभूत झाले.

**या नेत्यांचे पक्षांतरही निष्फळ**

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले पण नांदेडमध्ये भाजपचा पराभव झाला. माजी मंत्री बसवराज पाटील हेही काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले पण त्यांचा प्रभाव असल्याचे मानले जाते अशा लातूर आणि उस्मानाबादमध्ये महायुतीचा पराभव झाला. मिलिंद देवरा यांना शिंदेसेनेने काँग्रेसमधून येताच राज्यसभेवर पाठविले पण देवरांच्या दक्षिण मुंबईत शिंदेसेनेला पराभवाचा सामना करावा लागला. माजी खा.संजय निरुपम हे शिंदेसेनेत गेले पण या पक्षाला मुंबईत एकही जागा मिळाली नाही.

**पक्ष बदलला, निवडणूक लढविली अन्...**

नवनीत राणा यांनी भाजपमध्ये जाऊन अमरावतीची जागा लढविली पण त्यांचा पराभव झाला. पारनेरचे आमदार नीलेश लंके यांनी अजित पवार गटाचा राजीनामा देऊन शरद पवार गटात प्रवेश करत अहमदनगरची उमेदवारी मिळविली आणि डॉ.सुजय विखे पाटील यांचा पराभव केला.

चाळीसगावचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांनी भाजप सोडून उद्धवसेनेकडून जळगावात लढले पण त्यांचा पराभव झाला. माजी आमदार अमर काळे यांना शरद पवार गटाने वर्धेतून उमेदवारी दिली आणि ते विजयी झाले. भाजपमध्ये असलेले धैर्यशील मोहिते शरद पवार गटात गेले आणि त्यांनी दणक्यात विजय मिळविला.

# भारत जोडो यात्रेतील पाऊल पडले यशाकडे...

## भाजपला पूर्ण बहुमत मिळण्यापासून रोखले



**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनी निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच संविधानाची प्रत प्रत्येक भाषणादरम्यान हातात ठेवली आणि त्यांनी नरेंद्र मोदी संविधान बदलण्यासाठी ४०० जागा मागत असल्याचा दावा केला होता. त्याचा परिणाम निकालावर झाला आहे. जनतेने, विशेषतः उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, हरयाणा, राजस्थान आणि कर्नाटकातील मागासवर्गीय समाजातील लोकांनी राहुल गांधींच्या बोलण्यावर विश्वास ठेवला.

**संविधानाच्या मुद्द्यावर ठाम राहिले**

मोदी सरकार आणि गौतम अदानी यांना सतत प्रश्न विचारणे, एका मानहानीच्या प्रकरणात खासदारकी जाणे, सरकारी बंगला काढून घेणे, शेवटी वायनाडमध्ये निवडणूक लढवल्यानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून यांच्या सांगण्यावरून रायबरेलीतून निवडणूक लढविली. युट्युब आणि इंस्टाग्रामच्या माध्यमातून ते तरुणांपर्यंत पोहोचले. असे असले तरीही ते जातनिहाय जनगणना आणि संविधानाच्या मुद्द्याला ते धरून राहिले. त्याचा परिणाम म्हणून काँग्रेसच्या जागा वाढल्यामध्ये दिसून येते. १० मार्च रोजी राहुल गांधी यांनी भाजप खासदार अनंत हेगडे यांच्या संविधान बदलण्याच्या वक्तव्यावर टीका करत संविधान बदलण्यासाठी त्यांना ४०० जागांची गरज आहे, असे उत्तर दिले होते. त्या दिवसापासून ते निवडणूक प्रचार संपेपर्यंत ते या मुद्द्यावर कायम राहिले. धर्माला जात पुरून उरू शकते, हे त्यांना २०१९ च्या पराभवानंतर लक्षात आले होते. त्यामुळे संविधानाच्या मुद्द्यावर ठाम राहिले.

**२०१९ च्या पराभवानंतर राहुल गांधी शिकले की...**

२०१९ मध्ये झालेल्या पराभवानंतर लोक आपल्यावर विश्वास ठेवत नाहीत, असे राहुल गांधी यांना जाणवले होते. त्यानंतर २०२२ सप्टेंबरमध्ये राहुल गांधी यांनी भाजपने केलेली पप्पू नावाची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला.

यासाठी त्यांनी कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत पायी यात्रा काढली. या यात्रेत राहुल गांधी दररोज २५ किलोमीटर पायी चालत होते. पाच महिन्यात राहुल गांधी ३७०० किलोमीटर पायी चालले.

या यात्रेत त्यांनी आपल्या घरात, नंतर पक्षात आणि शेवटी जनतेमध्ये आपली प्रतिमा एक भक्कम आणि गंभीर नेता अशी तयार केली.

# चारसो पार, नही यार!

**संसदीय लोकशाही पद्धतीत सत्ताधारी पक्ष आणि तितकाच प्रबळ विरोधी पक्ष हवा असतो. तसे झाले नाही, तर सत्ताधारी पक्षाची एकाधिकारशाही सुरू होते आणि नंतर तो हुकूमशाहीकडे वाटचाल करू लागतो. भाजपने यापूर्वी काँग्रेसमुक्त भारत आणि नंतर विरोधी पक्षमुक्त भारत अशी घोषणा दिली होती. या घोषणा सत्ता मिळवण्यासाठी उपयुक्त असल्या, तरी त्या प्रत्यक्षात आल्या, तर लोकशाही व्यवस्थेला त्या मारक असतात. भारतातील निवडणुकांचा इतिहास अनेक घोषणांचा आहे 'जब तक सूरज चाँद रहेगा, इंदिरा तेरा नाम रहेगा', 'इंदिरा हटाओ, देश बचाओ', 'गरिबी हटाओ', 'गाय वासरू, नका विसरू', 'सब को देखा बारी बारी, अब की बार अटल बिहारी', 'मजबूत नेता निर्णायक सरकार', 'खेला होबे,' अब की बार मोदी सरकार, चारसो पार याबरोबरच कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा अशा घोषणांनी निवडणुकांची मैदाने गाजली आहेत. गीतातून, काव्यातून, अलंकारातून अचूक आणि थेट संदेश देणारी, आक्रमक, आकर्षक घोषणा लोकांच्या मनात रुंजी घालत असते. एखाद्या विरोधकांच्या काय प्रतिक्रिया येतात, यालाही महत्त्व असते. काँग्रेसच्या जाहिरातींचा वीट येऊन काँग्रेसला त्यांचा फटका बसला होता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातही 'शायनिंग इंडिया'वर लोकांची प्रचंड नाराजी दिसली होती. लोकांच्या करातून मिळालेला पैसा निवडणुकीच्या अगोदर सत्ताधारी पक्ष त्याची प्रतिमा उजळण्यासाठी घालवीत असेल, तर त्याची प्रतिक्रिया उमटतेच. महाराष्ट्रात सरकारचे विकासाचे गोडवे गाणारे रथ गावोगावी याच कारणासाठी रोखले जात होते. काहींनी तर थेट विकासकामांबाबत माहिती देता, की भाजपचा प्रचार करता असा सवाल केला होता. मोदी यांनी अबकी बार, चारशे पारची घोषणा केल्यानंतर त्याला पुढे यमक जोडून चारशे पार नव्हे, तडीपार अशी घोषणा काहींनी केली होती. विरोधकांना एखाद्या घोषणेतील कच्चे दुवे दिसले, तर प्रचारमोहिमेसाठी ओतलेला सगळा पैसा पाण्यात जाण्याची भीती असते. चुकीची घोषणा पुढची पाच वर्षे विरोधी बाकांवर बसवू शकते. घोषणा कितीही आकर्षक असली, तरी तिला तथ्याचा आधार लागतोच. अन्यथा, प्रचारमोहीम आणि सत्तेची स्वप्न पत्त्यांच्या बंगल्यांसारखी कोसळू शकतात. एखादी घोषणा यशस्वी होते, तेव्हा ती आपणच सर्वप्रथम दिल्याचे दावे अनेकजण करतात; पण 'चारसो पार'च्या बाबतीत ही शक्यता मोदी यांनी आधीच मोडीत काढली होती. आता जनतेने ती मोडीत काढून तीनशेच्या आत आणून ठेवली आहे.**

**भाजपच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला चारसो पारपासून तीनशेच्या आत जागा मिळण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला, हे समजून घेतले पाहिजे. काँग्रेसला चाळीसही जागा मिळणार नाही, असे म्हणणाऱ्यांना मतदारांनीच चपराक बसवली आहे. 'इंडिया आघाडी'ने अपक्षेपेक्षा मोठी उसळी घेतल्याने भाजपला मोठा धक्का बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट ओसरल्याचे आणि मोदी हमींवरचा लोकांचा विश्वासही कमी झाल्याचे निष्कर्ष निवडणुकीच्या निकालातून दिसतात. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांना 'एनडीए'त आता जास्त महत्त्व येण्याची शक्यता आहे; परंतु त्यांनाही मनोमन 'इंडिया' आघाडीशी जुळवून घेतले असते, तर बरे झाले असते, असे आता वाटत असेल. 'इंडिया'आघाडी बांधण्यात सुरुवातीला पुढाकार घेणारे नितीशकुमार यांना आता आपला निर्णय चुकला असे वाटत असेल. शरद पवार यांचे नितीशकुमार आणि चंद्राबाबू या दोघांशीही चांगले संबंध आहेत. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी पवार यांनी या दोघांशीही संपर्क साधून बरोबर येण्याचे साकडे घातले आहे. महायुती आणि 'इंडिया' आघाडीतील अन्य कुणी कुठे जाणार नाहीत; परंतु या दोघांमुळे सत्तेचे पारडे बदलू शकते. पवार यांनी त्यांना विशेष राज्याच्या सवलतीसह त्यांच्या अन्य मागण्या मान्य करण्याची ग्वाही दिल्याने आता या दोघांच्या भूमिकेवर सत्तेचा कौल कुणाकडे हे ठरू शकेल.**

**विशेष म्हणजे ज्या पाच राज्यांवर भाजपची मदार होती, त्याच बालेकिल्ल्यात भाजपला मोठा सुरुंग बसला आहे. भाजपला उत्तर प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि हरियाणात मोठा फटका बसला आहे. महाराष्ट्रासह अन्य राज्यांत फटका अपेक्षित होता; परंतु 'क्लीन स्वीप'ची स्वप्ने पाहणाऱ्या राजस्थान आणि उत्तर प्रदेशने तर कमालच केली. अखिलेश, राहुल गांधी, ममता बॅनर्जी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या चारसो पारच्या घोषणेला सुरुंग लावला. उत्तर प्रदेशात भाजपला गेल्या वेळेपक्षा निम्म्याही जागा मिळत नाहीत. उत्तर प्रदेशात राम मंदिर उभारल्यानंतर मोदी सरकारला मोठा फायदा होईल असे चित्र होते; परंतु राम काही भाजपला पावला नाही. भाजपने राजस्थानमध्ये २०१९ मध्ये 'क्लीन स्वीप' केले होते. काँग्रेसला एखाद-दुसरी जागा मिळण्याचा अंदाज होता. तिथे काँग्रेस दोन आकडीपर्यंत मजल मारण्याची चिन्हे होती. भाजपने सर्वाधिक लक्ष पश्चिम बंगालवर केंद्रीत केले होते. तिथे भाजप किमान २५-३० जागा जिंकेल, असे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात ममतादीदी भाजपला पुरून उरल्या. संदेशखाली, इतर मागासांची प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय, शिक्षक भरती घोटाळा असे कुठलेही मुद्दे भाजपच्या मदतीला आले नाहीत. 'चारसो पार'च्या या घोषणेने भाजपचा फायदा होण्यापेक्षा जास्त नुकसान केले आहे. या घोषणेमुळे भाजप कार्यकर्त्यांचा अतिआत्मविश्वास वाढला आणि त्यांनी मतदारांना वळवण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. उत्तर प्रदेशात भाजपने भाकरी फिरवलीच नाही. ज्यांच्यावर आरोप होते, ज्यांच्याविषयी नाराजी होती, त्यांनाच पुन्हा उमेदवारी दिली.**

**इतरांवर घराणेशाहीचे आरोप एकीकडे मोदी व भाजपचे नेते करीत असताना त्यांनीच घराणेशाही जोपासली. अनेकांना उमेदवारी दिली. भाजपने राज्यातील बहुतांश जागांवर उमेदवारांची पुनरावृत्ती केली होती. यामुळे जनतेने नाराजी मतपेटीतून दाखवली. ईशान्य क्षेत्र वगळता दिल्लीतील सर्व जागांवर भाजपने उमेदवार बदलले आहेत. तिथे त्याचा थेट फायदाही झालेला दिसतो. महाराष्ट्र, राजस्थान आणि उत्तर प्रदेशात उमेदवार बदलण्याचे प्रमाण कमी होते. बहुजन समाज पक्षाला गेल्या वेळी दहा जागा मिळाल्या होत्या. या वेळी त्यांची स्वबळाची चाल त्यांचा पक्ष संपवण्याच्या दिशेने घेऊन गेली. भाजपला त्याचा फायदा झाला नाही. मायावती यांचा हेतू लक्षात आल्याने लोकांनी ती मते 'इंडिया' आघाडीला देणे पसंत केले. न्यायालयाचा आदेश डावलून आरोप असलेल्यांची बांधकामे उद्ध्वस्त करण्याचा योगी सरकारचा निर्णय सामान्यांना अजिबात पसंत नव्हता. २०१९ च्या निवडणुकीत मायावती यांच्या पक्षाने १९ टक्क्यांहून अधिक मते मिळवली होती आणि १० जागा जिंकल्या होत्या. या वेळी मायावती यांच्या पक्षाची मतांची टक्केवारी दहाच्या आत आली. गेल्या निवडणुकीत सपाला केवळ १८ टक्के मते मिळाली होती, ती यावेळी ३१ टक्के झाली आहेत. या वेळी बसपची मते सपच्या खात्यात गेल्याचे स्पष्ट दिसत आहे. हरियाणात भाजपच्या जागा कमी झाल्या. काँग्रेसला तिथे चांगल्या जागा मिळाल्या. हरियाणा हा भाजपचा बालेकिल्ला आहे; मात्र पंजाब आणि हरियाणाच्या शेतकऱ्यांचे आंदोलन आणि सोयबीनच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे भाजपला भोवले आहे. भाजपच्या निगरगट्ट भूमिकेमुळेच भाजपचा पारंपारिक मतदार काँग्रेसकडे वळला आहे. पंजाबमध्ये भाजपचे मोठे नुकसान झाले.**

**धर्मनिरपेक्ष जनता दलाबरोबरची युती फायद्यात ठरण्याऐवजी भाजपचे मोठे नुकसान करून गेली. कर्नाटकातील २८ जागांपैकी भाजपने गेल्यावेळी २६ जिंकल्या होत्या. माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे चिरंजीव आणि नातवाने सुमारे तीन हजार महिलांचे लैंगिक शोषण केले. खासदार प्रज्वल रेवण्णा पराभूत झाला; परंतु त्याचबरोबर त्याच्यासाठी प्रचार करणाऱ्या मोदी यांनाही कर्नाटकच्या जनतेने झटका दिला. ऐन निवडणुकीत हे प्रकरण बाहेर येऊनही रेवण्णा प्रकरणावर भाजपने पाहिजे तशी ॲक्शन घेतली नाही. उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक जागा आहेत. महाराष्ट्रात ४८ जागा असून २२ जागांवर भाजपचा विजय झाला होता; मात्र या वेळी भाजपला आणि त्याच्या मित्रपक्षांनाही मोठा फटका बसला आहे. भाजपने शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडल्यानंतरही त्यांना त्याचा फायदा झाला नाही. उलट उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना सहानुभूती मिळाली.**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# भाजपानं नितीश, चंद्राबाबू, ममतांना प्रचंड छळलंय : उद्धव ठाकरे

लोकसभा निवडणुकीचे निकाल जवळपास स्पष्ट झाले असून भाजपाला बहुमत मिळालेलं नाही. देशात सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपाला तेलुगू देशम पार्टी, संयुक्त जनता दलासह एनडीएतील इतर मित्रपक्षांची मदत घ्यावी लागणार आहे. एनडीएने २९० जागांवर आघाडी मिळवली असली तर इंडिया आघाडीनेदेखील २३५ जागांवर आघाडी घेतली आहे. परिणामी भाजपाच्या चिंता वाढल्या आहेत. अशातच इंडिया आघाडीतील नेत्यांनी एनडीएतील पक्षांना त्यांच्याबरोबर घेण्याचे प्रयत्न सुरू केल्याची चर्चा आहे. यावर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, इंडिया आघाडीने देशात सत्तास्थापनेचा दावा करायला हवा. हे जुलूम करणारं सरकार पडण्याच्या उंबरठ्यावर असून त्यांना आपण हटवायला हवं.

दादर येथील शिवसेना भवन येथे उद्धव ठाकरे यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना प्रश्न विचारण्यात आला की, इंडिया आघाडी टीडीपी, जेडीयू या पक्षांशी संपर्क साधणार का? यावर उद्धव ठाकरे म्हणाले, जे लोक भाजपामुळे त्रस्त आहेत ते आमच्याबरोबर येतील. सर्व देशभक्त इंडिया आघाडीबरोबर येणार. भाजपाने टीडीपीचे प्रमुख ए. चंद्राबाबू नायडू यांना खूप त्रास दिला आहे. तसेच इतर पक्षांनाही या लोकांनी खूप त्रास दिला आहे. ते लोकही आमच्याबरोबर येतील. तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी आमच्याबरोबर आहेत, भाजपाने त्यांनाही खूप छळलंय. जे जे लोक भाजपाला कंटाळलेत, भाजपावर संतापलेत ते लोक आमच्याबरोबर येतील.

उद्धव ठाकरे म्हणाले, एखादा राजकीय पक्ष त्यांच्या विरोधकांना इतका त्रास कसा काय देऊ शकतो? लोकशाहीत, राजकारणात विरोधक असतातच. परंतु, हा विरोध जीवघेणा असता कामा नये. कुठेही सूडाचं राजकारण होता कामा नये. त्यामुळे भाजपाला त्रासलेले देशभक्त इंडिया आघाडीत येतील. आम्ही इतर पक्षांशी बोलणार आहोत. माझं ममता बॅनर्जी यांच्याशी बोलणं झालं आहे. आम्ही सर्वजण एकत्र होतो आणि पुढेही एकत्र राहू

उद्धव ठाकरे म्हणाले, या निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट झालं आहे की, देशातील सर्वसामान्य जनतेने त्यांची ताकद दाखवून दिली आहे. त्याबद्दल मी देशातील जनतेचं अभिनंदन करतो. सत्ताधारी लोक मस्तवाल झाले तर आपण त्यांना हरवू शकतो, एका बोटाच्या सहाय्याने त्यांना सत्तेतून हद्दपार करू शकतो, त्यांचा उधळलेला वारू रोखू शकतो आणि सर्वसामान्य जनतेने तेच केलं आहे. त्याबद्दल मला आपल्या जनतेचा अभिमान आहे.

# खासदार डॉ.अमोल कोल्हे बहुमताने दुसऱ्यांदा विजयी

## जनतेने निवडणूक हाती घेतल्याने विजय : खासदार डॉ कोल्हे यांची प्रतिक्रिया

**नारायणगाव :** शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत विद्यमान खासदार डॉ अमोल कोल्हे हे दुसऱ्यांदा दणदणीत मतांनी विजयी झाले आहेत. हा केवळ माझा विजय नसून सर्वसामान्य जनतेने निवडणूक हातात घेतल्यामुळे या विजयाचे श्रेय महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व सर्वसामान्य जनता यांना द्यावे लागेल अशी प्रतिक्रिया डॉ कोल्हे यांनी दिली. खासदार डॉक्टर कोल्हे यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा सुमारे दीड लाख मतांनी दणदणीत पराभव केला आहे या निवडणुकीत जुन्नर आंबेगाव खेड हडपसर या सहाही मतदारसंघातून खासदार डॉक्टर कोल्हे यांनी पहिल्या फेरीपासून शेवटच्या फेरीपर्यंत विजयाची आघाडी कायम ठेवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे. ज्याप्रकारे



भारतीय जनता पार्टीने शिवसेना व राष्ट्रवादी पक्ष फोडून सत्ता हस्तगत केली तो प्रकार सर्वसामान्य जनतेला न पटण्यासारखा होता यामुळे शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी शरद पवार गट यांना मोठी सहानुभूती संपूर्ण महाराष्ट्र सह शिरूर लोकसभा मतदारसंघात देखील पाहायला मिळाली. याचा थेट परिणाम निकालावर दिसून आला. या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे खासदार डॉक्टर कोल्हे यांच्या सोबत यावेळेस केवळ एक आमदार अशोक पवार प्रचारामध्ये त्यांच्या बाजूने होते. याउलट मागील निवडणुकीमध्ये पाच आमदार खासदार कोल्हे यांच्या बरोबर होते त्यामुळे या पाच आमदारांमुळेच ते खासदार झाले असा समज किंवा असा प्रचार निवडणुकीदरम्यान केला गेला. मात्र खासदार कोल्हे यांनी यावेळी आपल्या वक्तृत्वशैलीने व केलेल्या कामाच्या जोरावर मोठा विजय संपादन केला. खासदार कोल्हे यांच्या विजयाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी त्यांचे विरोधी उमेदवार शिवाजीराव आढळराव यांना केलेल्या आवाहनांना व आरोपांना आढळराव यांना उत्तरे देता आली नाहीत. याशिवाय कांदा व इतर शेतमालाला नसलेला भाव, आढळराव यांनी निवडणूक लढवण्यासाठी बदललेले पक्ष तसेच अमोल कोल्हे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी ठेवलेला एकनिष्ठ पणा तसेच पक्षासाठी व इतर उमेदवारांच्या प्रचारासाठी दिलेला वेळ यामुळे देखील खासदार डॉक्टर कोल्हे हे पुन्हा एकदा बहुमताने निवडून आले आहेत. या निवडणुकीत खासदार डॉक्टर कोल्हे यांना खेड तालुक्याने सुमारे ५५,००० चे मताधिक्य दिले असून जुन्नर तालुक्याने ५१,५५९ मतांचे मताधिक्य दिले. आंबेगाव तालुक्यांने ११ हजार ४५० मतांचे, शिरूर तालुक्याने ३० हजारांचे, भोसरी मधून ९,००० व हडपसर मतदारसंघातून १७ हजार ९५८ एवढे मताधिक्य मिळाले.

# वर्षा गायकवाडांनी अखेरच्या फेऱ्यांमध्ये मारली बाजी,

## उज्ज्वल निकमांना पराभवाचा धक्का!




उत्तर मध्य मुंबईत काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी भाजपाच्या ॲड. उज्ज्वल निकम यांना जोरदार धक्का दिला आहे. वर्षा गायकवाड यांनी १६ हजार ५१४ मतांनी विजय प्राप्त केला आहे. २०१९ च्या निवडणुकीतील दोन्ही पक्षांच्या उमेदवारांना या मतदार संघात तिकीट नाकारलं गेलं होतं. भाजपकडून पूनम महाजन यांचं तिकीट कापून उज्ज्वल निकम यांना देण्यात आलं. तर काँग्रेसकडून प्रिया दत्त यांच्याऐवजी वर्षा गायकवाड यांना उमेदवारी देण्यात आली होती.

मतमोजणीत सुरुवातीच्या १० टप्प्यांमध्ये उज्ज्वल निकम आघाडीवर होते. निकम यांच्याकडे ५० हजारांहून अधिक मतांनी पुढे होते. शेवटच्या काही टप्प्यांमध्ये वर्षा गायकवाड यांनी भक्कम आघाडी घेत निकम यांना मागे टाकलं आणि अखेरीस विजयावर शिक्कामोर्तब केलं आहे.

वर्षा गायकवाड यांना एकूण ४ लाख ४५ हजार ५४५ मतं मिळाली आहेत. तर उज्ज्वल निकम ४ लाख २९ हजार ०३१ मतांनी दुसऱ्या स्थानावर आहेत. वंचितच्या संतोष आंबुलगे यांनी ८ हजार २८८ मतं घेतली आहेत.

# धैर्यशील मोहिते-पाटलांच्या विजयानंतर 'शिवरत्न'वर जल्लोष

**सोलापूर :** माढालोकसभा मतदारसंघातील शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील हे विजयी झाले आहेत. विजयानंतरसोलापूरसहमाळशिरस,माढा, करमाळा, सांगोला, अकलूज येथे विजयी जल्लोष सुरू आहे. जेसीबीच्या माध्यमातून गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे.

या आनंदात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, पत्नीनंदिनीदेवी विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह मोहिते-पाटील कुटुंबातील प्रत्येक सदस्य सहभागी झाला आहे. मतमोजणी परिसरातील रामवाडी परिसरातही मोहिते-पाटील समर्थकांनी विजयी जल्लोष केला. माढा लोकसभा मतदारसंघात धैर्यशील मोहिते-पाटील यांना करमाळ्यातून १४ हजार ५००, माढ्यातून १७ हजार ५००, सांगोल्यातून ५ हजार ६००, माळशिरसमधून ९७ हजार, माणमधून ५ हजार २०० मतांची लीड मिळाला आहे. धैर्यशील मोहिते-पाटलांना ६ लाख ३८ हजार ५०० मते मिळाली असून भाजपाचे उमदेवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना ५ लाख १४ हजार मते मिळाली आहे. धैर्यशील मोहिते-पाटील हे १ लाख ३९ हजार ८०० मतांनी विजयी झाले आहेत. त्यांच्या विजयाची अधिकृत घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अद्याप केली नाही.

# ओमराजे निंबाळकरांना बार्शी तालुक्यातून मिळाला ५५ हजाराचा लीड

**सोलापूर :** धाराशिव लोकसभा मतदारसंघातील उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवारओमराजे निंबाळकरयांचा विजय निश्चित मानला जात आहे. २४ व्या फेरीअखेर ते अडीच लाखांच्या मताधिक्क्याने आघाडीवर आहेत.

अंतिम निकाल हाती येणे बाकी असून विजयी घोषित अद्याप निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे. दरम्यान,सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातून ओमराजे निंबाळकरांना ५५ हजाराचा लीड मिळाला आहे.दरम्यान, ओमराजेंच्या विजयाबद्दल बार्शी तालुक्यातील वैराग येथेजिल्हा परिषदेच्या आरोग्य व शिक्षण समितीचे माजी सभापती मकरंद निंबाळकर, रवी पांढरमिशे, अहमद शेख, समीर शेख , मनोज वाघमारे आदींसह कार्यकर्ते यांनी

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष केला. बार्शी तालुक्यात माजी आमदार दिलीप सोपल यांनी ओमराजेंच्या विजयासाठी मोठे प्रयत्न केले. अजित पवार गटाच्याअर्चनाताई पाटील यांना ३ लाख ३८ हजार २३५ मते मिळाली आहेत. ओमराजें निंबाळकर व अर्चना पाटील यांच्या अटीतटीची लढत झाली होती. ओमराजेंच्या प्रचारार्थ उध्दव ठाकरे यांनी सभा घेतली होती. या सभेला मतदारांचा






# गडकरींची नागपुरातून हॅटट्रीक,१.३७ लाखांचे मताधिक्य

**नागपूर :** संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या नागपूर मतदारसंघात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपला दबदबा कायम राखत विजय मिळविला आहे. त्यांची ही हॅटट्रीक ठरली आहे. एकूण मतदानाच्या ५४.०५ टक्के मत गडकरी यांच्याच पारड्यात आली आहेत. मागील वेळच्या तुलनेत गडकरी यांचे मताधिक्य १.५६ टक्क्यांनी घटले आहे.

मंगळवारी मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या फेरीपासूनच गडकरींनी आघाडी घेतली होती व अखेरच्या फेरीपर्यंत ही आघाडी कायम राहिली. प्रत्येक फेरीनंतर त्यांचे मताधिक्य वाढतच गेले. नागपुरच्या रिंगणात एकूण २६ उमेदवार उभे होते व १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात मतदान झाले होते. नागपुरात एकूण १२ लाख ७ हजार ४५५ इतके मतदान झाले. नितीन गडकरी यांना एकूण ६ लाख ५५ हजार २७ मतं पडली होती तर काँग्रेसचे विकास ठाकरे यांना ५ लाख १५ हजार ९४१ मते मिळाली. गडकरी यांचा एकूण ५ लाख ३७ हजार ६०३ इतक्या मतांनी विजय झाला.

'एक्झिट पोल्स'चे अंदाज खरे ठरले

नागपूर लोकसभा मतदारसंघात युतीचेच उमेदवार विजयी होतील, असा अंदाज 'एक्झिट पोल्स'मधून वर्तविण्यात आला होता. निकालानंतर हा अंदाज खरा ठरल्याचे दिसून आले. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या नागपूर लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मिळालेल्या दणदणीत विजयामुळे त्यांचे केंद्रातील वजन आणखी वाढले आहे. या विजयामुळे गडकरी यांनी एक नवा इतिहास रचला आहे. गडकरी यांच्या विजयाचे संपूर्ण श्रेय त्यांच्या विकासकारणाला जात असून नागपुरात झालेल्या विकासकामांची पावती मतदारांनी मतांच्या रुपात त्यांना दिलेली आहे.

मतदारांचे प्रेम व त्यांचा विश्वास यामुळेच हा विजय मिळाला आहे. नागपूरच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध राहील. देशातील विकसित शहरांच्या यादीत नागपूरला स्थान मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. कार्यकर्त्यांचे प्रेम व आपला विश्वास हीच माझी मोठी ताकद आहे, अशी प्रतिक्रिया नितीन गडकरी यांनी दिली.

# महाराष्ट्रात मोदींचा करिष्मा ओसरला, जनतेचा कौल महाविकास आघाडीला !

**संतोष गायकवाड**

**मुंबई :** राज्यातल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला असून महाविकास आघाडीने मोठी मुसंडी मारली आहे. भाजप, शिंदे आणि पवार गट या महायुतीने ४८ पैकी ४५ प्लसचा नारा दिला होता. मात्र महायुतीला अवघ्या १८ जागांवर विजय मिळवला आहे. महायुतीचा दारूण पराभव झाला आहे. तर महाविकास आघाडीने ३० जागांवर विजय मिळवला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन पक्ष फोडल्यानंतरही भाजपला यश मिळवता आलेले नाही. तसेच मोदींचा करिष्मा महाराष्ट्रात दिसून आला नाही.

राज्यात काँग्रेसने सर्वाधिक १३ जागांवर विजय मिळवला आहे. त्याखालोखाल भाजप ९ शरद पवार गट ८ शिंदे गट ७ तर अजित पवार गटाला १ जागा मिळाली आहे. त्यामुळे राज्यात काँग्रेस एक नंबरचा पक्ष ठरला आहे. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर शिवसेनेत मोठी फूट पडली तर राष्ट्रवादीतून अजित पवार गट फुटला. भाजपच्या फोडाफोडीच्या राजकारणाविरोधात जनतेने कौल दिल्याचे दिसून आले. त्यामुळे भाजपला मोठया पराभवाला सामोरे जावे लागले आहे.




महाराष्ट्रात महायुतीत भाजपने सर्वाधिक २३ जागा लढवल्या. यापाठोपाठ शिंदे गटाने १५ तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाने ४ जागा लढवल्या. तर महाविकास आघाडीमध्ये शिवसेना ठाकरे गटाने २१ जागा, काँग्रेसने १७ जागा तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने १० जागा लढवल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात अनेक सभा रोड शो करूनही त्यांचा करिष्मा महाराष्ट्रात दिसून आलेला नाही. बीडमधून भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा तर अमरावतीमधून नवनीत राणा यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

### राज्यात काँग्रेसचे कमबॅक

मागील दोन लोकसभा निवडणुकांपासून भाजप आणि एनडीएन मुसंडी मारली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला ४१ जागांवर विजय मिळाला होता. यातील २३ भाजपाच्या तर १८ शिवसेनेच्या होत्या. त्याउलट राष्ट्रवादी काँग्रेसला ४ आणि काँग्रेसला फक्त एकाच जागेवर विजय मिळवता आला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र राजकीय चित्र पूर्णपणे बदललेलं दिसतं आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसनं २५ जागा लढवून फक्त एकाच जागेवर विजय मिळवला होता. तर यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसनं १५ जागांवर निवडणूक लढवली होती. लोकसभा निवडणुकीतून काँग्रेसनं महाराष्ट्रात जोरदार कमबॅक केलं आहे.

### तीन केंद्रीय मंत्र्यांचा पराभव

राज्यात भाजपला मोठा झटका बसला आहे. राज्यातील तीन केंद्रीय मंत्र्यांना दारूण पराभव झाला. यात जालना लोकसभा मतदार संघात रावसाहेब दानवे पराभूत झाले आहे, त्या ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे यांचा विजय झाला तर दिंडोरी मतदारसंघातून केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांचाही पराभव झाला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे भास्कर भगरे यांनी भारती पवार यांचा पराभव केला आहे तर भिवंडी लोकसभा मतदार संघात कपिल पाटील यांचा देखील पराभव झाला शरद पवार गटाचे उमेदवार बाळयामामा म्हात्रे यांनी पराभव केला.

### बारामतीत अजित पवारांना धक्का

**संपूर्ण देशाचे लक्ष वेधलेल्या बारामतीतून सुप्रिया सुळे विजयी झाल्या आहेत. सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव केला आहे. राष्ट्रवादी पक्ष फुटल्यावर बारामतीमध्ये सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार अशी नणंद भावजय अशी लढत झाली होती. सुप्रिया सुळे यांनी सलग चौथ्यांदा लोकसभा निवडणुक जिंकली आहे. सुप्रिया सुळे यांनी एक लाखपेक्षाा जास्त मतांनी सुनेत्र पवार यांचा पराभव केला आहे. दरम्यान, अजित पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने लढवलेल्या चार जागांमध्ये फक्त रायगडमध्ये सुनील तटकरे हे एका जागेवर विजयी झाले आहेत.**

### शरद पवार, उद्धव ठाकरेंना जनतेचा कौल

**शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाकडून पक्षाचं नाव आणि चिन्ह शिंदे गट आणि अजित पवार गटाला देण्यात आलं होतं. उध्दव ठाकरे यांना मशाल तर शरद पवार यांना तुतारी हे नवीन चिन्हावर निवडणूक लढवावी लागली. फोडाफोडीच्या राजकारणाला डगमगून न जाता पवार आणि ठाकरे यांनी पद्धतशीरपणे निवडणूकीची आखणी केली. योग्य उमेदवार दिले त्याचा फायदा निवडणुकीत दिसला. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर उद्धव ठाकरे यांचे प्राबल्य दिसले. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेनेचा आवाज घुमणार अशी चिन्हे आहेत. ठाकरे यांनी राज्यभर प्रचार करत भाजपवर टीकास्त्र सोडले. शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्याच पाठीशी असल्याचे या निकालातून स्पष्ट झालय. फोडीफोडीचे राजकारण जनतेला पटले नसल्याने भाजपला मोठया पराभवाला सामोरे जावे लागले असून पवार ठाकरेंना जनतेचा कौल मिळाला आहे.**

### राहुल गांधींमुळे काँग्रेसला नवसंजीवनी

राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेमुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आणि पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे. राहुल गांधींची प्रतिमा यातून मोठ्या प्रमाणात बदलली आणि देशभरात लोक राहुल गांधीशी जोडले गेले. याचा सकारात्मक परिणाम काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या कामगिरीवर झाला. तर इंडिया आघाडीनं देशात आणि महाविकास आघाडीनं महाराष्ट्रात एकदिलानं काम केलं. जागावाटप करताना आणि निवडणूक लढवताना एकजूट कायम राखत निवडणुकीतील मुख्य मुद्द्यांवर त्यांनी लक्ष केंद्रित केलं त्यामुळे महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं.

महाविकास आघाडी
काँग्रेस १३
ठाकरे गट ९
शरद पवार ८
महायुती
भाजप ९
अजित पवार १

# उदयनराजेंचा शशिकांत शिंदेंविरोधात ३२७७१ मताधिक्याने विजय



**सातारा :** साताऱ्यातील लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार उदयनराजे भोसले यांनी काँग्रेस उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या विरोधात विजय मिळवला आहे. उदयनराजे यांना ५ लाख ७१ हजार १३४ मते मिळाली. त्यांनी शिंदे यांचा ३२ हजार ७७१ मतांच्या फरकाने पराभव केला.

निकालांत सुरुवातीच्या कलांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शशिकांत जयवंतराव शिंदे यांनी आघाडी घेतल्याचं पाहायला मिळालं. पण नंतर उदयनराजे यांनी पिछाडी भरून काढत विजयाचा गुलाल उधळला. भाजपनं याठिकाणी पुन्हा एकदा उदयनराजे भोसलेंना मैदानात उतरवलं होतं. शरद पवार यांनी या मतदारसंघात चांगलाच जोर लावल्याचं पाहायला मिळालं होतं.

२०१९ मध्ये शरद पवारांचं पावसातलं भाषण चांगलंच गाजलं होतं. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची दिशाच बदलून गेल्याचं पाहायला मिळालं होतं. शरद पवारांना साताऱ्याने भरभक्कम साथ देण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती. पक्षाच्या स्थापनेपासूनच सातारा हा कायम राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे.

**१९९६ च्या 'त्या' निवडणुकीचा अपवाद वगळता काँग्रेस-राष्ट्रवादीचं वर्चस्व**

सातारा हा दीर्घकाळ काँग्रेसच्या विचारधारेकडे झुकलेला मतदारसंघ राहिला आहे. १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत तत्कालिन सातारा दक्षिण आणि सातारा उत्तर मतदारसंघातून अनुक्रमे काँग्रेसचे वेंकटराव पीराजीराव पवार आणि गणेश सदाशिव आळतेकर हे निवडून आले होते. किसन वीर यांनीही या मतदारसंघाचं प्रतिनिधीत्व केलं.

१९६७ ते १९८४ असा प्रदीर्घ काळ या मतदारसंघाचं नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दिग्गज नेत्याने केलं. आणिबाणीनंतर १९७७ साली झालेल्या निवडणुकीत रायबरेलीतून इंदिरा गांधींचा पराभव झाला, मात्र साताऱ्यामधून यशवंतराव चव्हाण आणि कराडमधून प्रेमलाकाकी चव्हाण या भरघोस मताधिक्याने जिंकून आल्या होत्या.

काँग्रेसचे नेते प्रतापराव भोसले, अभयसिंहराजे भोसले यांनी सातारा लोकसभा मतदारसंघाचं नेतृत्व केलं.

काँग्रेसला भक्कम साथ मिळण्यात सहकाराच्या राजकारणाचीही वाटा होता.

१९९६ ची निवडणूक ही अपवाद होती. यावेळी साताऱ्यातून शिवसेनेचे उमेदवार हिंदुराव निंबाळकर निवडून आले होते. अर्थात, त्यांच्या विजयाला काँग्रेसमधील अंतर्गत कलहही कारणीभूत ठरला.

काँग्रेसचे साताऱ्याचे तत्कालिन खासदार प्रतापराव भोसले हे शरद पवार यांचे पक्षांतर्गत कट्टर विरोधक म्हणून ओळखले जात होते.

विद्यमान खासदार असल्यामुळं प्रतापरावांची उमेदवारी कापणं शक्य नव्हतं. परंतु प्रतापराव भोसले यांचा पराभव करण्याची व्यूहरचना आखण्यात आली होती असं म्हणतात. त्यासाठी काँग्रेसच्या मतांमध्ये विभागणी करण्यासाठी अनेक समविचारी उमेदवार उभे करण्याची खेळी करण्यात आली.

**खासदारांची यादी**

याचवेळी उदयनराजे भोसले यांनी पहिल्यांदा अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. त्याचबरोबर पार्थ पोळके, कर्नल आर. डी. निकम असे इतरही उमेदवार उभे करण्यात आले.

त्याचाच परिणाम म्हणून शिवसेनेच्या हिंदुराव नाईक-निंबाळकरांनी प्रतापराव भोसलेंचा बारा हजार मतांनी पराभव केला.

१९९९ साली जेव्हा काँग्रेसपासून वेगळं होत शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्यानंतर सातारा लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचंच वर्चस्व राहिलं आहे.

**२०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत काय झालं होतं?**

२००९ साली उदयनराजे भोसले पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर खासदार म्हणून निवडून आले. त्यांनी शिवसेनेच्या पुरूषोत्तम जाधव यांचा पराभव केला.

२०१४ मध्येही राष्ट्रवादी काँग्रेसने उदयनराजे भोसलेंनाच उमेदवारी दिली. एरव्ही भाजप-शिवसेना युतीमध्ये पहिल्यापासून सातारा मतदारसंघ हा शिवसेनेकडेच राहिला होता. मात्र, २०१४ ला युतीमध्ये ही जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला सोडण्याचा निर्णय घेतला गेला. नाराज झालेल्या पुरूषोत्तम जाधव यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली.

पण उदयनराजे भोसले यांना ५,२२,५३१ मतं मिळाली, तर पुरूषोत्तम जाधव यांना १,५५,९३७. रिपाइंच्या अशोक गायकवाड यांना ७१८०८ मतं मिळाली. देशभरात मोदी लाट असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसने आपला बालेकिल्ला टिकवला.

२०१९ ला राष्ट्रवादी काँग्रेसने तिसऱ्यांदा उदयनराजे भोसले यांना उमेदवारी दिली. शिवसेनेने त्यांच्याविरोधात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांना उमेदवारी दिली.

उदयनराजेंनी या निवडणुकीत नरेंद्र पाटील यांचा पराभव केला, पण त्यांचं मताधिक्य कमालीचं घटलं होतं. उदयनराजेंना या निवडणुकीत ५ लाख ७९ हजार ०२६ मतं मिळाली, तर नरेंद्र पाटील यांना ४ लाख ५२ हजार ४९८ मतं मिळाली.

पण उदयनराजे भोसले यांनी या निवडणुकीनंतर अवघ्या पाच महिन्यांत खासदारकीचा राजीनामा दिला आणि भाजपमध्ये प्रवेश केला.

शरद पवारांसोबत श्रीनिवास पाटील साताऱ्यात लोकसभेची पोटनिवडणूक जाहीर झाली आणि भाजपकडून उदयनराजेंना उमेदवारीही देण्यात आली. तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या प्रचाराचा नारळ फोडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यासाठी प्रचार सभाही घेतली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून शरद पवारांनी आपले जुने सहकारी आणि ज्येष्ठ नेते श्रीनिवास पाटील यांना उमेदवारी दिली.

शरद पवारांची पावसातील सभा हा या निवडणुकीतला टर्निंग पॉइंट होताच. पण उदयनराजेंविषयी मतदारसंघात फार अनुकूल वातावरणही नव्हतं१६ व्या लोकसभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडून आलेल्या उदयनराजे भोसले यांची लोकसभेतील उपस्थिती अवघी २७ टक्के होती.

त्यांनी प्रश्नही उपस्थित केले नाहीत, कोणते खाजगी विधेयक मांडले नाही की चर्चेत भागही घेतला नव्हता. या सगळ्याचा फटकाही उदयनराजेंना बसलाच.

सातारा लोकसभा मतदारसंघाची रचना आणि बलाबल

सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये सुरूवातीला अकरा विधानसभा मतदारसंघ होते. २००९ च्या पुनर्रचनेत सातारा मतदारसंघ सहा विधानसभा मतदारसंघात विभागला गेला.

पूर्वी कराड लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात होता, तो पुनर्रचनेत सातारा लोकसभा मतदारसंघात विलीन झाला आणि नव्याने माढा लोकसभा मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली. आता सातारा लोकसभा मतदारसंघात वाई, कोरेगाव, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण, सातारा या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

# अकोल्यात भाजपाने गड राखला

**अकोला :** लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी त्यांच्या वडिलांच्या विजयाची मालिका कायम ठेवत विजयश्री खेचून आणला. अंत्यत चुरशिच्या झालेल्या या लढतीत धोत्रे यांनी काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांचा ४०,६२६ मतांनी पराभव केला. डॉ.अभय पाटील यांनी तगडी लढत दिली. ॲड प्रकाश आंबेडकरांच्या सोशल इंजिनिअरींगचा करिष्मा यावेळीही चालला नसल्याने त्यांना या निवडणुकीत तिसऱ्या क्रमाकांची मते मिळाली.



या मतदारसंघात १९८९, १९९१ आणि १९९६ मध्ये भाजपचे स्व. पांडुरंग फुंडकर सतत तीनदा विजयी झाले होते. तो विक्रम मोडीत काढत संजय धोत्रे यांनी २०१९ च्या निवडणुकीत चौथ्यांदा निवडून येत नव्या विक्रमाची नोंद केली होती. तीच परंपरा त्यांचे चिरंजीव अनुप धोत्रे यांनी राखली आहे. संजय धोत्रे यांनी पक्ष बांधणीवर भर देऊन जिल्ह्यात भाजपची ताकद निर्माण केली. ते सलग चार वेळा खासदार होते, पाचव्यांदा त्यांचे चिरंजीव अनुप धोत्रे विजयी झाल्याने अकोला मतदारसंघ धोत्रेंचाच असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. निवडणूक प्रचारादरम्यान, संजय धोत्रे यांच्यानंतर पाचव्यांदा पुन्हा त्यांच्याच चिरंजीवाला उमेदवारी दिल्याने नकारात्मक लाट आहे, असे वातावरण निर्माण करण्यात आले होते, तथापि विरोधकांच्या या सर्व प्रकारच्या प्रचारावर मात करीत अनुप धोत्रे यांनी विजय मिळविला.

अकोला लोकसभा मतदारसंघात १८ लाख ९० हजार ८१४ मतदार असून, त्यापैकी ११ लाख ६८ हजार ३६६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. २०१९ च्या तुलनेत यावेळी पार पडलेल्या निवडणुकीत मतदानात १.७३ टक्क्यांनी वाढ झाली होती. यामध्ये -------- नवीन मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. या मतदारांना आकर्षित करण्यात विरोधक अपयशी ठरले. धोत्रे यांनी ४,५७,३० इतकी मते मिळवली, काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांना ४,१६,४०४ अशी घवघवीत मते मिळाली. यावेळी ड. प्रकाश आंबेडकर तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना २,७६,७४७ इतकी मते मिळाली.

वंचित बहुजन आघाडीचे काँग्रेसच्या महाविकास आघाडीसोबत समीकरण जुळले नसल्याने काँग्रेसने ठरल्याप्रमाणे डॉ. अभय पाटील यांना रिंगणात उतरविले. ड. आंबेडकर यांनी सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग करीत आपले मताधिक्य वाढविण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला; परंतु आंबेडकरांनी यावेळी मांडलेली वेगळी चूल पुरोगामी विचारांच्या मतदारांना रुचली नसल्याने या निकालावरून अधोरेखित होत आहे. मुस्लीम मतदारांनी यावेळी काँग्रेसच्या पारड्यात झाडून मतदान टाकले. काँग्रेसने सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या महागाई, बेरोजगारी मुद्दा प्रखरतेने लावून धरला. असे असले तरी भाजप सत्तेत आल्यास भारतीय राज्यघटना बदलणार यावर रान उठवले होते. यामुळे आंबेडकरी, बहुजन समाजाने ड. आंबेडकरांऐवजी यावेळी काँग्रेसला साथ दिल्याचे या निकालावरून स्पष्ट होत आहे.

डॉ. पाटील यांनी दिली कडवी झुंज

काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील १५ फेरीपर्यंत आघाडीवर होते. त्यानंतरच्या फेरीनंतर त्यांच्या आघाडीत घट होत भाजपचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी आघाडी घेतली, ती शेवटच्या २८ व्या फेरीपर्यंत कायम होती. परंतु डॉ. अभय पाटील निवडणुकीत नवखे असताना त्यांनी कडवी झुंज दिली.

ड. आंबेडकरांची मते घटली

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ड. प्रकाश आंबेडकर यांना २,७८,८४८ मते मिळाली होती. या निवडणुकीत त्यांच्या मतांचा टक्का २,१०१ मतांनी घटला आहे

# 'मैं हू ना' म्हणत विशाल पाटील यांचा एक लाखांच्या मताधिक्याने विजय

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील तडजोडीच्या (सेटलमेंट) राजकारणाला तडे देत, प्रस्थापित नेत्यांनी उमेदवारी डावलण्यासाठी लावलेल्या षडयंत्राचा दरवाजा फोडून अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांचा एक लाखांच्या मताधिक्याने बहुमताने विजय झाला. 'मैं हु ना' हा विशाल यांच्या प्रचारातील टॅग लाईन होती. सांगली लोकसभा मतदारसंघात अपक्ष खासदार म्हणून इतिहास घडवित विशाल पाटील यांचा दिल्लीस्वारीचा मार्ग मोकळा झाला आहे. निकालाच्या पहिल्या फेरीपासून काँग्रेस भवनासमोर कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरू होता.

राज्यभरात चर्चेत असलेल्या सांगली लोकसभा निवडणुकीच्या निकालाची सर्वांना उत्सुकता होती. सांगली हा काँग्रेसचा बालेकिल्ला असूनही प्रदेश उपाध्यक्ष विशाल पाटील यांना उमेदवारीसाठी डावलण्यात आले. त्याऐवजी जिल्ह्यात ताकत नसतानाही महाविकास आघाडीकडून उद्धवसेनेची उमेदवारी पैलवान चंद्रहार पाटील यांना देण्यात आली. विशाल पाटील यांना उमेदवारी डावलण्यामागे सांगलीतील काँग्रेस, राष्ट्रवादी व भाजपच्या काही नेत्यांचे तडजोडीचे राजकारण झाले. महाविकास आघाडीतील नेत्यांच्या षडयंत्राला आम्ही फसलो, अशी कबुली काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगलीतील सभेत दिली. त्यामुळे जिल्ह्यातील षडयंत्राचे व तडजोडीचे राजकारण सांगलीच्या मतदारांनी उधळून लावले.

अपक्ष विजयी, काँग्रेसचा जल्लोष..

सांगलीचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील





यांचे घराणे संपविण्यासाठी त्यांच्या वारसदारांना उमेदवारी डावलली, त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस अस्तित्वाचा प्रश्न आहे, अशा मुद्द्यांमुळे विशाल पाटील यांच्याविषयी सहानुभूतीची लाट जिल्हाभर तयार झाली. त्यामुळे गावागावात व गटातटात विखुरलेला काँग्रेस कार्यकर्ता प्रदेश कार्याध्यक्ष विश्वजित कदम यांच्या नेतृत्वाखाली एकवटला. त्यांनी विशाल पाटील यांना अपक्ष उमेदवारीसाठी आग्रह केला. नेत्या ऐवजी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक हाती घेतल्याने सहानभुतीची लाट तयार झाली. या लाटेत विरोधी भाजपचे खासदार संजय पाटील व चंद्रहार पाटील यांच्यासाठी दिग्गज नेत्यांचा पराभव झाला. अपक्ष विशाल पाटील हे विजयी झाले असलेतरी त्यांच्यामागे काँग्रेसचे कार्यकर्ते भक्कमपणे उभे राहिल्याने त्यांनी जल्लोष केला.

कार्यकर्ते जिंकले, नेते हारले..

विशाल पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहाने बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी लढविली. मात्र, वंचितचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर, माजी आमदार विलासराव पाटील व माजीमंत्री अजितराव घोरपडे हे वगळता एकाही नेत्याने विशाल पाटील यांच्यासाठी प्रचार सभा घेतली नाही. काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. विश्वजित कदम यांचा छुपा पाठिंबा असलातरी थेट तेही विशाल पाटील यांच्या प्रचारसभेला येऊ शकले नाहीत. अनेक नेत्यांना उघडपणे काम करण्याची इच्छा असूनही कोणी युतीधर्म तर कोणी आघाडी धर्म पाळण्यासाठी विशाल पाटील यांना जाहीर पाठिंबा देऊ शकले नाहीत. उलट जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघातील नेते महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारासोबत, तर विशाल पाटील यांच्यामागे केवळ कार्यकर्ते भक्कमपणे होते. त्यामुळे विशाल पाटील यांच्या विजयामध्ये कार्यकर्ते जिंकले व नेते हारले अशी चर्चा आहे.

## गड आला; पण सिंह गेला

एकीकडे पुण्यात रवींद्र धंगेकर यांचा पराभव झाला आणि अपेक्षित निकाल न लागल्याने कार्यकर्ते निराश होते. मात्र, महाराष्ट्र आणि केंद्रात इंडिया आघाडीने चांगल्या जागा मिळविल्याने काँग्रेस कार्यालयात समाधानाचे वातावरण होते.

नुकताच भाजपचा गड मानल्या जाणाऱ्या कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी शानदार विजय मिळविल्यामुळे धंगेकर विरुद्ध मोहोळ यांच्या लढतीला महत्त्व प्राप्त झाले होते. स्वतः राहुल गांधी यांनी सभा घेतली होती आणि पुणेकरही धंगेकर यांना निवडून देतील, असे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पुण्यात धंगेकर पराभूत झाले आणि इंडिया आघाडीने मात्र, राज्य आणि देशात चांगली कामगिरी केली. त्यामुळे 'गड आला; पण सिंह गेला' अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# निवडणूक निकालानंतर नरेंद्र मोदी भावूक



**आजचा विजय हा १४० कोटी भारतीयांचा विजय**

**आजचा विजय विकसित भारताच्या संकल्पनेचा विजय आहे. सबका साथ, सबका विकास या मंत्राचा हा विजय आहे, आज झालेला विजय १४० कोटी भारतीयांचा विजय आहे. मी आज देशाच्या निवडणूक आयोगाचेही आभार मानतो. निवडणूक आयोगाने जगातली सर्वात मोठी निवडणूक संपन्न केली. १०० कोटी मतदार, ११ लाख पोलिंग बूथ, दीड कोटी मतदान कर्मचारी, ५५ लाख व्होटिंग मशीन्स इतकी तयारी होती. तसंच प्रचंड उन्हात आपलं कर्तव्य प्रत्येकाने पाळलं. आपल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांचं कर्तव्य अत्यंत चोखपणे बजावलं. भारतातली निवडणूक प्रक्रिया आणि यंत्रणा यांच्या विश्वासार्हतेवर प्रत्येक भारतीयाला गर्व आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.**

भारतातल्या जनतेने दाखवलेलं प्रेम, आपुलकी आणि आशीर्वाद यासाठी मी सगळ्या देशाचा ऋणी आहे. आज मंगल दिवस आहे. या पावन दिवशी एनडीएचा सलग तिसऱ्यांदा विजय झाला आहे आणि आम्ही सरकार स्थापन करणार आहोत हे निश्चित झालं आहे. आम्ही सगळेजण जनता जनार्दनाचे आभार मानतो. देशाने भाजपावर, एनडीएवर विश्वास दाखवला आहे. आजचा हा विजय जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचा विजय आहे असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मतदारांचे आभार मानले आहेत.

**निवडणूक प्रक्रिया ही अभिमानास्पद प्रक्रिया**

अशा प्रकारे निवडणूक होण्याचं उदाहरण जगात कुठेही नाही. मी सगळ्यांना आज सांगू इच्छितो, देशाच्या लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया ही एक ताकद आहे. ही प्रक्रिया एक गौरवशाली परंपरा आहे. मी सगळ्यांना आग्रहाने सांगू इच्छितो की देशाची ही परंपरा जगात पोहचवा. यावेळी भारतात ज्या मतदारांनी मतदान केलं ते लोकशाही मानणाऱ्या अनेक देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. जम्मू काश्मीरच्या मतदारांनी अभूतपूर्व उत्साह दाखवला. भारताची बदनामी करणाऱ्यांना त्यांनी आरसा दाखवला आहे. या विजयी पर्वाच्या निमित्ताने मी सगळ्यांना आदराने नमस्कार करतो. देशातल्या सगळ्या पक्षांचं, उमेदवारांचं मी अभिनंदन करतो. लोकशाहीचं हे विराट यश आज आपल्याला दिसतं आहे त्यात सगळेच सहभागी होते. असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

**१९६२ पहिल्यांदा देशात तिसऱ्यांदा एका पक्षाचं सरकार आलं आहे**

आज जो जनादेश मिळाला आहे त्याचे काही पैलू आहेत. १९६२ च्या नंतर पहिल्यांदा एक सरकार असं आलं आहे जे तिसऱ्यांदा परतलं आहे. दोन कार्यकाळ यशस्वी करुन हे सरकार परत आलं आहे. राज्यांमध्ये ज्या ठिकाणी विधानसभा निवडणूक झाली तिथेही एनडीएला भव्य विजय मिळाला. अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश किंवा सिक्कीम असो या राज्यांमध्ये काँग्रेसचा सूपडा साफ झाला आहे.

माझ्याकडे सगळे तपशील नाही पण अनेकांचं डिपॉझिट जप्त झालं आहे हे मला ठाऊक आहेत. भाजपाचं ओदिशामध्ये सरकार स्थापन करणार आहे. पहिल्यांदाच प्रभू जगन्नाथाच्या भूमित भाजपाचं सरकार स्थापन होणार आहे. केरळमध्येही आमच्या कार्यकर्त्यांनी बलिदान दिलं आहे. कैक पिढ्यांपासून ज्या क्षणाची वाट पाहत होतो तो क्षण आला आहे. तेलंगणमध्ये आपली संख्या डबल डिजिट झाली आहे. हिमाचल, छत्तीसगढ, मध्य प्रदेश, गुजरात, दिल्ली, उत्तराखंड या काही राज्यांमध्ये आपल्या पक्षाने क्लिन स्वीप केलं आहे. मी या सगळ्या राज्यांचेही आभार मानतो असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

माझी आई देवाघरी गेल्यानंतर ही पहिली निवडणूक होती. पण देशाच्या माता, भगिनींनी मला आईची कमतरता भासू दिली नाही. मला त्यांच्याकडून हे प्रेम मिळालं. हे सगळं मतदानाच्या संख्येत दिसत नाही. मी जे अनुभवलं आहे ते अनुभव रोमांच उभे करणारे आहेत. राष्ट्र प्रथम ची भावना ही आपल्यासाठी महत्वाची आहे.